आतील पानात वाचा

- जिल्हा परिषद शाळांच्या जमीन मालकीचा प्रश्न...
- पैशापेक्षा पाण्याचे महत्त्व अनन्यसाधारणच!
- राज्यस्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेसाठी सारा येवलेची निवड...

दैनिक
अक्षराज
अचूक वेध,अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०६ | अंक : ८१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.०३ नोव्हेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

महाराष्ट्रात अवकाळी पाऊस बरसला पण..

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.०२, पुणे : ऑक्टोबरचा शेवट आणि नोव्हेंबरची सुरुवात पावसाने झाली आहे. महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाने जोरदार बॅटिंग केली आहे. पावसाच्या अचानक एन्ट्रीने सगळेच सुखावले. पुणे, अहिल्यानगर आणि सातारामध्ये पावसाचीने दमदार हजेरी लावली आहे.

मुसळधार पावसामुळे रस्तेही जलमय झाले होते, अनेक ठिकाणी पाणी साचलं इतका पाऊस पडला. या अचानक आलेल्या पावसामुळे काही ठिकाणी वाहतूक सेवाही विस्कळीत झाली होती, एकंदरीतच अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची पुरती तारांबळ उडालेली. पण उकाड्यामुळे हैरान झालेल्या पावसामुळे नागरिकांना दिलासा मिळाला. पण असे असूनही काही ठिकाणी पाऊस न पडल्याने पाण्याची कमतरतेची चिंता कायम आहे.

राज्यात ऑक्टोबर महिन्यात सरासरीच्या तुलनेत तब्बल ९५ टक्के कमी पावसाची नोंद झाली आहे. ऑक्टोबरमध्ये राज्यात सरासरी ७४ मिमी पाऊस अपेक्षित होता पण; प्रत्यक्षात केवळ ३.६ मिमी पाऊसच पडला आहे. राज्यातील १२ जिल्ह्यांम ध्ये संपूर्ण ऑक्टोबर महिन्यात पावसाचा एकही थेंब पडलेला नाही. मुंबई शहर, धुळे, जळगाव, नंदुरबार, सोलापूर, बीड, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, हिंगोली, जालना, लातूर आणि परभणी या जिल्ह्यांत शून्य पावसाची नोंद झाल्याचे पाहायला मिळत आहे.

या १२ जिल्ह्यांमध्ये पावसाची १०० टक्के तूट नोंदवली गेली आहे. या मुंबई शहरात सरासरी ७३.५ मिमी पाऊस अपेक्षित होता पण प्रत्यक्षात शून्य टक्के पाऊस पडला आहे. मुंबई उपनगरात सरासरी ८१.२ मिमीच्या तुलनेत १४.६ मिमी पाऊस; ८२ टक्के तूट दिसत आहे. मराठवाड्यात



ऑक्टोबर महिन्यात एकही मिलीमीटर पाऊस नसल्याचे समोर येत आहे. म ध्य महाराष्ट्रात सरासरी ७७.९ मिमीच्या तुलनेत केवळ ४.१ मिमी पाऊस; ९५ टक्के तूट आहे. विदर्भात सरासरी ५७.८ मिमीऐवजी केवळ २.२ मिमी पाऊस; ९६ टक्के तूट असल्याचे दिसत आहे. कोकण-गोवा विभागात सरासरी ११६.४ मिमीच्या तुलनेत १९.१ मिमी पाऊस पडला आहे; तर ८४ टक्के तूट असल्याचे दिसत आहे. पालघर आणि रायगडमध्ये ९६ टक्के, तर ठाण्यात ८४ टक्के पावसाची तूट आहे.

शरद पवार पुण्याच्या रुबी हॉल रुग्णालयात दाखल !



अक्षराज : वृत्तसंकलन

दि.०२, पुणे : महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांची प्रकृती बिघडल्याची माहिती समोर येत आहे. शरद पवार यांना प्रकृती अस्वस्थामुळे पुण्याच्या रुबी हॉल रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. शरद पवार यांच्या कन्या तथा खासदार सुप्रिया सुळे यांनी या वृत्ताला दुजोरा दिला आहे. त्यांनी ट्विट करत याबाबत माहिती दिली आहे. बाबांना खोकल्याचा त्रास सुरु झाल्यामुळे पुण्याच्या रुबी हॉल क्लिनिकमध्ये दाखल करण्यात आलं आहे. त्यांच्या सर्व वैद्यकीय चाचण्या सुरु असून प्रकृती स्थिर आहे. आपल्या प्रेम आणि शुभेच्छांसाठी धन्यवाद, असं सुप्रिया सुळे यांनी ट्विट करत म्हटलं आहे.

शरद पवार यांच्याकडून राज्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली जात होती. त्यांचा तीन दिवसांचा दुष्काळी दौरा होता. विशेष म्हणजे सोमवारी या दौऱ्याची सुरुवात झाली. त्यांनी सोलापूर जिल्ह्यात दुष्काळी परिसराची पाहणी केली. तसेच ते धाराशिव जिल्ह्यात आज पोहोचले होते. पण काही कारणास्तव त्यांनी हा दौरा रद्द केल्याची माहिती समोर आली होती. यानंतर आता पुण्याच्या रुबी हॉल रुग्णालयात त्यांना दाखल करण्याती आल्याची माहिती आहे. शरद पवार याआधीदेखील रुटीन चेकअपसाठी रुबी हॉल रुग्णलयात दाखल झाले होते.

वरिष्ठ डॉक्टरांची टीम शरद पवारांच्या प्रकृतीकडे लक्ष ठेवून

सध्या शरद पवार यांच्यावर रुबी हॉल रुग्णलयात उपचार सुरु आहेत. रुबी हॉल रुग्णालयाच्या वरिष्ठ डॉक्टरांची टीम त्यांच्या प्रकृतीकडे लक्ष ठेवून आहे. त्यांची प्रकृती सध्या स्थिर आहे. ते लवकरच बरे होतील. दरम्यान, डॉक्टरांनी शरद पवारांना दोन दिवस आराम करण्याची सूचना दिल्याची माहिती आहे.

शरद पवारांनी सुरु केलेला दुष्काळी दौरा

शरद पवार यांनी ३१ ऑक्टोबरपासून बारामतीतून दुष्काळ दौऱ्याला सुरुवात केली होती. सोलापूर, धाराशिव, बीड आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांतील दुष्काळी भागांना भेटी देऊन शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेण्याचे त्यांचे नियोजन होते. पावसाअभावी खरीप पिकांचे झालेले नुकसान, पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न याबाबत शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधण्यावर या दौऱ्यात भर होता.

अन्न व औषध प्रशासनाची मोठी कारवाई !

भिवंडीसह कोकण विभागात १२ कोटींहून अधिक किमतीचा संशयास्पद खाद्यसाठा जप्त

अक्षराज : प्रतिनिधी

दि.०२, ठाणे : दिवाळी आणि आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांची सुरक्षा आणि अन्नपदार्थांची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाच्या (FDA) गुप्तवार्ता दक्षता विभागाने धडक कारवाई मोहीम राबवली आहे. सह आयुक्त प्रिती टिपरे (दक्षता) आणि सह आयुक्त सचिन जाधव (कोकण विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेत या आठवड्यात एकूण १२,४२,८७,१५३ रुपयांचा संशयास्पद आणि मिथ्याछाप अन्नसाठा जप्त करण्यात आला आहे.

भिवंडी येथील डीमार्ट (ॲव्हेन्यू सुपरमार्ट्स लिमिटेड) मध्ये २९ ऑक्टोबर २०२६ रोजी टाकलेल्या छाप्यामध्ये १,३१,२११ किलो वजनाचे आणि ४,०६,६४,४८४ रुपये किमतीचे खाद्यतेल जप्त करण्यात आले. हे खाद्यतेल मिसब्रँडेड लेबल दोष आणि निकृष्ट दर्जाचे असल्याचा संशय आहे. याशिवाय, २७ ऑक्टोबर रोजी भिवंडीतीलच अंबीया ट्रेडर्सवरही कारवाई करण्यात आली; तिथे जुन्या डब्यांचा वापर करून अस्वच्छ जागेत खाद्यतेलाचे पॅकिंग केले जात असल्याने ९८३ किलो वजनाचा आणि १,८२,६७८ रुपये किमतीचा साठा जप्त करून अन्न परवाना तात्काळ निलंबित करण्यात आला.

भिवंडीप्रमाणेच कोकणातील इतर भागांतही अशाच प्रकारच्या मोठ्या कारवाई करण्यात आल्या आहेत. २४ ऑक्टोबर २०२६ रोजी रायगडम धील पनवेल येथील 'M/s. Ajfan International Retails LLP' वर



कारवाई करून मोठ्या प्रमाणावर इम्पोर्टेड चॉकलेट्स, ड्रायफ्रूट्स आणि एनर्जी ड्रिंक्स जप्त करण्यात आले, ज्यांची किंमत ४,२१,०६,९६१ रुपये होती. याच दिवशी तुर्भे, नवी मुंबई येथील 'मे. सावला फूड्स अँड कोल्ड स्टोरेज प्रा. लि.' वर धडक देऊन एकूण ९१,३५३ किलो वजनाचा ४,१३,३३,०३० रुपये किमतीचा साठा जप्त करण्यात आला. यामध्ये जर्दाळू, अंजीर, बेदाणे, काळी मिरी, खजूर यांसारख्या पदार्थांचा समावेश होता; ज्यामध्ये लेबलदोष असण्यासोबतच २६ प्रकारचे तब्बल १,६२,९८,६८० रुपये किमतीचे मुदतबाह्य (एक्सपायर्ड) अन्नपदार्थही आढळून आले.

गुप्त माहितीच्या आधारे अन्न सुरक्षा अधिकारी यू. एस. बडे, माणिक जाधव आणि डॉ. गजानन साबळे यांनी ही माहिती गोळा केली होती. अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ आणि त्यांतर्गत नियम २०११ च्या तरतुदींचे गंभीर उल्लंघन केल्याप्रकरणी या सर्व कारवाया करण्यात आल्या आहेत.

नागरिकांना सणासुदीच्या काळात सुरक्षित अन्न मिळावे यासाठी प्रशासनाकडून ही विशेष तपासणी म ोहीम अशीच कठोरपणे सुरू राहणार आहे.

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वे अपघातात दादरच्या दाम्पत्याचा मृत्यू

अल्पवयीन लेकरांना ३ कोटींची भरपाई



अक्षराज : वृत्तसंकलन

दि.०२, मुंबई : मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर सन २०१८ मध्ये झालेल्या भीषण अपघातात आई-वडिलांचे छत्र हरपलेल्या दादरमधील दोन अल्पवयीन मुलांना व्याजासह सुमारे तीन कोटी रुपयांची भरपाई देण्याचा आदेश मुंबई मोटार वाहने अपघात न्यायाधिकरणाने (मॅक्ट) नुकताच दिला आहे.

या अपघातात मुलांचे वडील असलेल्या गाडी चालकाची जबाबदारी ७० टक्के होती, असा निष्कर्ष न्यायाधिकरणाने काढल्याने भरपाईच्या रकमेत मोठी कपात झाली. अन्यथा सुमारे साडेसहा कोटी रुपयांची भरपाई मुलांना मिळू शकली असती. भरपाईची रक्कम सिदक व समर्थ या दोन्ही मुलांना तसेच, त्यांच्या आजी पूजा चुग (६४) यांना विशिष्ट प्रमाणात वाटून देण्याचे निर्देश न्यायाधिकरणाने दिले आहेत.

कसा झाला अपघात?

मूळ बंगळुरुचे आणि त्यावेळी मुंबईत राहणारे अंकित चुग (३४) व त्यांच्या पत्नी संजना चुग (३४) हे आपल्या दोन लहान मुलांसोबत २३ डिसेंबर २०१८ रोजी पहाटे गाडीने प्रवास करत होते. द्रुतगती मार्गावर त्यांची गाडी असताना राजस्थानमधील बांसवाडा येथील पुन्या ट्रान्स्पोर्टेशन कंपनीच्या मालकीचा ट्रक भरधाव वेगाने त्यांच्या पुढे होता. एकाक्षणी ट्रकचालक भरत कुमार याने अचानक ब्रेक लावल्याने अंकित यांची गाडी मागून ट्रकवर जोरदार आदळली. त्यानंतर गाडी सुमारे एक किलोमीटरपर्यंत फरफटत गेली. या अपघातात अंकित व संजना यांना रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, तिथे दोघांचा मृत्यू झाला होता.

जखमी मुलांसह कुटुंबीयांचा दावा

या प्रकरणी नवीन पनवेल पोलिसांनी ट्रकच्या अज्ञात चालकाविरोधात गुन्हा दाखल केला होता. या दुर्घटनेच्या वेळी चुग दाम्पत्याची समर्थ व सिदक ही मुले अनुक्रमे सात व चार वर्षांची होती आणि अपघातात दोघेही जखमी झाले होते. अपघातानंतर या मुलांसह कुटुंबीयांनी हा दावा दाखल केला होता. या अपघाताला ट्रकचालक जबाबदार असल्याचा चुग कुटुंबीयांचा दावा होता. तर, ट्रकचा विमा उतरवलेल्या नॅशनल इन्शुरन्स कंपनीने भरपाईची जबाबदारी नाकारत अपघाताला कारचालक अंकित हेच पूर्णपणे जबाबदार असल्याचा युक्तिवाद केला होता.

सुरक्षित अंतर राखले नाही म्हणून...

न्यायाधिकरणाने उपलब्ध पुराव्यांचा विचार केल्यानंतर अपघाताला ट्रकचालक ३० टक्के, तर अंकित हे ७० टक्के जबाबदार असल्याचा निष्कर्ष काढला. त्यामुळे, 'अंकित यांनी पुढील वाहनापासून सुरक्षित अंतर राखले नव्हते. परिणामी, अपघात टाळण्यासाठी त्यांना वेळीच गाडीचा वेग नियंत्रित करता आला नाही', अशी कारणमीम ांसा देत, न्यायाधिकरणाने त्यांच्या मृत्यूपोटी भरपाईची रक्कम कमी निश्चित केली.

फडणवीसांच्या मंत्रिमंडळात सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रवादीच्या माजी मंत्र्याचं कमबॅक होणार ?

मोठी राजकीय घडामोड! मुख्यमंत्र्यांसोबत काय चर्चा झाली?

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.०२, मुंबई : राज्यात राजकीय घडाम ोडींना वेग आला आहे. सुनेत्रा पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील माजी मंत्र्याचं लवकरच फडणवीसांच्या मंत्रिमंडळात कमबॅक होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. यासाठी एक माजी मंत्री आणि वरिष्ठ मंत्र्याने महायुतीमधील प्रमुख नेत्यांची भेट घेतल्याची माहिती आहे. ही भेट रविवारी रात्री झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी माजी मंत्र्यांच्या मंत्रिमंडळातील एन्ट्रीला ग्रीन सिग्नल दिला आहे. या माजी मंत्र्यासाठी राष्ट्रवादीच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार, पार्थ पवार, जय पवार यांनी गुरुवारी रात्री वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याची माहिती



सूत्रांनी दिली. या भेटीमुळे मंत्रिमंडळात फ ेरबदल होणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. या नेत्याला सुनेत्रा पवार यांच्याकडे असलेल्या अतिरिक्त खात्याची जबाबदारी देण्याची विनंती स्वत: सुनेत्रा पवार यांनी केल्याची माहिती समोर येत आहे.

सुनेत्रा पवार यांनी याआधी देखील केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली होती. त्यानंतर मुंबईत राष्ट्रवादीच्या कोअर कमिटीची बैठक झाली होती. त्यानंतर या कमिटीमधील मंडळींनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली होती.

त्यानंतर आज सोमवारी सायंकाळी चार वाजता कोअर कमिटीची बैठक होईल. ज्या मंत्र्याचं मंत्रिमंडळात कमबॅक होईल, त्या नेत्याला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे असलेल्या अतिरिक्त खात्याची जबाबदारी मिळणार असल्याची चर्चा आहे. दरम्यान, राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांनी आज देखील केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली.

या भेटीवेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि खासदार पार्थ पवार देखील नव्हते. ही भेट राष्ट्रवादीला अर्थखाते पुन्हा मिळावे, यासाठी झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. नवी दिल्लीतील या भेटीत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रफ ुल्ल पटेल, छगन भुजबळ, समीर भुजबळ, धनंजय मुंडे, हसन मुश्रीफ आणि दिलीप वळसे पाटील या फोटोमध्ये दिसताहेत. या भेटीने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलंय.



नवे वायुदलप्रमुख!

देशाच्या संरक्षण व्यवस्थेत भारतीय हवाई दलाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. देशाच्या हवाई सीमांचे रक्षण करणे, शत्रूच्या हल्ल्यांना चोख प्रत्युत्तर देणे आणि युद्धाच्या प्रसंगी निर्णायक भूमिका बजावणे ही हवाई दलाची प्रमुख जबाबदारी आहे. अशा म हत्त्वपूर्ण दलाच्या नेतृत्वाची धुरा एअर चीफ मार्शल आशुतोष दीक्षित यांनी देशाचे २९ वे वायुदलप्रमुख म्हणून स्वीकारली आहे. त्यांची ही नियुक्ती भारतीय हवाई दलासाठी महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

एअर चीफ मार्शल आशुतोष दीक्षित यांना भारतीय हवाई दलातील प्रदीर्घ अनुभव आहे. चार दशकांहून अधिक काळ त्यांनी हवाई दलात विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. लढाऊ विमानांचे वैमानिक म्हणून त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. प्रशिक्षण, हवाई मोहिमा, विमानांची देखभाल, संरक्षणविषयक नियोजन आणि महत्त्वाच्या प्रशासकीय जबाबदाऱ्या अशा विविध क्षेत्रांत त्यांनी काम केले आहे. त्यांच्या अनुभवाचा निश्चितच भारतीय हवाई दलाला फायदा होणार आहे.

आज जागतिक स्तरावर युद्धाचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. आधुनिक लढाऊ विमाने, क्षेपणास्त्रे, ड्रोन, रडार यंत्रणा, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाला संरक्षण क्षेत्रात विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. रशिया-युक्रेन युद्ध आणि इतर आंतरराष्ट्रीय संघर्षांतून आधुनिक युद्धतंत्राचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. त्यामुळे भारतीय हवाई दलाचे आधुनिकीकरण करणे ही काळाची गरज आहे. स्वदेशी बनावटीची लढाऊ विमाने विकसित करणे, हवाई संरक्षण यंत्रणा अधिक सक्षम करणे आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे यावर नव्या वायुदलप्रमुखांना विशेष लक्ष द्यावे लागणार आहे.

भारताच्या सुरक्षेच्या दृष्टीने पाकिस्तान आणि चीन या दोन्ही देशांकडून असलेल्या आव्हानांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. सीमावर्ती भागातील परिस्थिती लक्षात घेता भारतीय हवाई दलाची सज्जता, सामर्थ्य आणि युद्धक्षमता वाढविणे आवश्यक आहे. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत शत्रूला चोख प्रत्युत्तर देण्याची क्षमता भारतीय हवाई दलाकडे असली पाहिजे. त्याचबरोबर तिन्ही संरक्षण दलांमध्ये समन्वय आणि आधुनिक साधनसामग्रीची उपलब्धता असणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

भारतीय हवाई दलाने कारगिल युद्धापासून ते विविध दहशतवादविरोधी आणि संरक्षणात्मक मोहिमांपर्यंत आपले सामर्थ्य सिद्ध केले आहे. देशाच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करण्यासाठी हवाई दलातील जवान आणि अधिकारी अहोरात्र सज्ज असतात. त्यांच्या शौर्याचा आणि त्यागाचा देशाला सार्थ अभिम ान आहे.

नव्या वायुदलप्रमुखांसमोर हवाई दलाचे आधुनिकीकरण, स्वदेशी संरक्षण उत्पादनांना प्रोत्साहन, वैमानिकांचे प्रशिक्षण, मनुष्यबळाची क्षमता वाढविणे आणि भविष्यातील आव्हानांसाठी दलाला सज्ज करणे अशी अनेक आव्हाने आहेत. आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेनुसार संरक्षण क्षेत्रात परदेशावरील अवलंबित्व कमी करून स्वदेशी तंत्रज्ञानाला प्राधान्य देणेही गरजेचे आहे.

एअर चीफ मार्शल आशुतोष दीक्षित यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा आणि नेतृत्वगुणांचा भारतीय हवाई दलाला निश्चितच लाभ होईल, अशी अपेक्षा आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय हवाई दल अधिक आधुनिक, साम र्थ्यशाली आणि आत्मनिर्भर बनेल, असा विश्वास वाटतो. देशाच्या हवाई सीमांचे रक्षण करणाऱ्या या महत्त्वपूर्ण दलाचे सामर्थ्य अधिक वाढो आणि भारताची सुरक्षा अभेद्य राहो, हीच अपेक्षा.

- श्याम ठाणेदार

जिल्हा परिषद शाळांच्या जमीन मालकीचा प्रश्न

प्रस्तावना – आज राज्यातील जिल्हा परिषदांच्या शेकडो शाळांना मालकी हक्क नाही. अपुऱ्या चौकशीच्या आधारावर जिल्हा परिषद व पंचायत समित्यांनी लाखो रुपये खर्चून शाळा इमारती बांधल्या परंतु मालकी जागेची चौकशी न करता उभारलेल्या अशा कैक शाळांच्या मालकी हक्कांचा गंभीर प्रश्न सध्या भेडसावत आहे. यांमुळे शाळा व खासगी मालमत्ता धारक यांचे वादविवाद होत असून शिक्षकांवर तक्रारी होत आहेत. दुसरीकडे अनेक शाळा या वन विभाग, गायरान तसेच इतर शासकीय जमिनींवर उभ्या आहेत. अशा शाळांना ग्रामपंचायत वित्त आयोगाचा निधी मिळताना अडचणी उभ्या राहत आहेत. त्यामुळे शिक्षण हा जरी हक्क असला तरी या हक्काला जिवंत ठेवणाऱ्या शाळांना हक्क कोण देणार ? असा प्रश्न यानिमित्ताने उभा ठाकला आहे.

जिल्हा परिषद शाळा ही केवळ इमारत नसते; ती ग्रामीण समाजाच्या शैक्षणिक हक्काची सार्वजनिक संस्था असते. मात्र, ज्या शाळेत अनेक पिढ्यांनी शिक्षण घेतले, ज्या जागेवर शासनाने लाखो रुपयांचा निधी खर्च करून इमारत उभी केली, त्या जागेची मालकीच स्पष्ट नसेल, तर त्या शाळेचे भविष्य अनिश्चित राहते. ही केवळ महसुली नोंदीतील त्रुटी नाही. हा सार्वजनिक मालमत्तेचा, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या हक्काचा, ग्रामविकासाचा आणि शासनाच्या प्रशासकीय उत्तरदायित्वाचा गंभीर प्रश्न आहे. विशेष म्हणजे स्वातंत्र्यापूर्वी सुरु झालेल्या शाळादेखील आज मालकी हक्क मागत आहेत. अतिक्रमण केल्याने मुख्याध्यापकांवर गुन्हे दाखल होत आहेत. याकडे शासनाने गंभीरतेने पाहण्याची गरज आहे.

१. शाळेची इमारत शासनाची; मग जमीन कोणाची?

महाराष्ट्रातील ग्रामीण भागात जिल्हा परिषदांच्या शाळांनी शिक्षणाचा प्रसार करण्यात ऐतिहासिक भूमिका बजावली आहे. अनेक गावांमध्ये शाळा सुरू झाल्यापासून अनेक दशके उलटली आहेत. काही ठिकाणी शासनाच्या जमिनीवर, शाळा ज्या जमिनीवर उभी आहे, त्या जमिनीचे कायदेशीर हस्तांतरण झाले आहे का, मालकी कोणाची आहे, सातबारा किंवा मालमत्ता पत्रकात कोणाचे नाव आहे, दानपत्र नोंदणीकृत आहे का, शासनाकडे वैध हस्तांतरणाचा आदेश आहे का ? याची शहानिशा न करता अनेक शाळा उभ्या राहिल्या. सर्व शिक्षा अभियानात एक किलोमीटर अंतर ग्राह्य धरून शाळा बांधण्यात आल्या. परंतु या शाळा बांधताना मालकी हक्क न तपासता घाईघाईने निधी वितरीत करून इमारती बांधण्यात आल्या. अशा जागांवर आता इमारत शासनाची आहे परंतु जमीन नाही. खासगी जमिनीवर उभ्या असलेल्या या शाळा नेमक्या कुणाच्या समजायच्या असा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. खासगी मालक विरोधात असल्यास शाळा शिक्षक व मुख्याध्यापक यांना त्यांची मर्जी राखावी लागत आहे.

शाळेची इमारत सार्वजनिक निधीतून बांधली गेली म्हणून तिच्याखालील जमीन आपोआप शासनाच्या किंवा जिल्हा परिषदेच्या मालकीची होत नाही. म्हणूनच हा प्रश्न केवळ सातबारा दुरुस्तीचा नसून, जमिनीचा कायदेशीर हक्क निश्चित करण्याचा आणि सार्वजनिक शैक्षणिक पायाभूत सुविधांना दीर्घकालीन संरक्षण देण्याचा आहे.

२. शाळांच्या जमीन मालकीच्या प्रश्नामागील वास्तव अडचणी

२.१ शासकीय जमिनीचे हस्तांतरण अपूर्ण असणे –

अनेक ठिकाणी शाळेसाठी शासकीय जागा उपलब्ध करून देण्यात आली परंतु संबंधित विभागाकडून जिल्हा परिषद किंवा सक्षम स्थानिक प्राधिकरणाच्या नावे आवश्यक हस्तांतरण आदेश झाला नाही. मंजुरी नसल्याने वापरहक्काची नोंद अपूर्ण राहिली. त्यामुळे शेकडो शाळा या सरकारी जागांवर उभ्या असून त्या अतिक्रमणात आहेत हे वास्तव आहे.

२.२ ग्रामपंचायतीच्या जमिनीवरील शाळा –

ग्रामपंचायतीच्या मालकीच्या जागेवर शाळा उभी असल्यास ग्राम पंचायतीचा ठराव, संबंधित जमीन अभिलेख, मालमत्ता नोंदवही आणि लागू कायद्यानुसार आवश्यक असलेली सक्षम अधिकाऱ्याची मंजुरी तपासली नाही. मोकळ्या जागा या ग्रामपंचायत मालकीच्या समजून बांधकाम करण्यात आले. ग्रामपंचायतीला संबंधित जमीन हस्तांतरित करण्याचा अधिकार होता का, कोणती परवानगी आवश्यक होती आणि ती घेण्यात आली का, याबाबत कोणतीही खातरजमा न केल्याने आज ग्रामपंचायत ठरावाने बांधण्यात आलेल्या इमारती देखील मालकी हक्काच्या प्रतीक्षेत असू शकतात.

२.३ खासगी जमिनीवरील शाळा : हा सर्वांत संवेदनशील प्रकार आहे. एखाद्या शेतकऱ्याने, जमीनमालकाने किंवा ग्रामस्थाने पूर्वी शाळेसाठी जागा दिली असेल; परंतु दानपत्र, नोंदणीकृत हस्तांतरणखत, भाडेपट्टा किंवा इतर वैध दस्तऐवज करण्यात आला नसल्याची अनेक उदाहरणे आहेत. जमीनमालकाचा मृत्यू झाल्यानंतर वारसांनी हक्क सांगणे, जमीन विकण्याचा प्रयत्न करणे, बांधकामासाठी हरकत घेणे किंवा जागा परत मागणे असे प्रकार घडत आहेत. जागा मालकांच्या तक्रारी व त्यातून होणारे राजकारण शिक्षकांच्या कामाला प्रतिकूल ठरत आहे. साधी दुरुस्ती करतानाही जागा मालकांची तोंडी परवानगी घ्यावी लागत आहे. त्यामुळे ९० वर्षांपासून सुरु असलेल्या शाळाही मालकी हक्कांच्या प्रतीक्षेत आहेत.

२.४ जुने दस्तऐवज व त्यातील विसंगत नोंदी – पूर्वी शाळा बांधण्यात आल्या. त्यावेळी शिक्षण मंडळे अस्तित्वात होती. बांधकाम स्थानिक भागात झाले किंवा सरकारी बांधकाम खात्याने केले. जमीन मात्र महसुली खात्याने किंवा इतर खात्याने नोंद दुसरीच घेतली. शाळांच्या नोंदी वेगवेगळ्या कार्यालयांत विखुरलेल्या आहेत. जुने ठराव, सनद, दानपत्र, ताबा पावती, बांधकाम मंजुरी, नकाशे किंवा फेरफार नोंदी सापडत नसल्याने अडचणी उभ्या राहत आहेत. कधी शाळा शिक्षण विभागाच्या नोंदीत असते, इमारत बांधकाम विभागाच्या अभिलेखात असते आणि जमीन महसूल विभागाच्या नोंदीत वेगळ्याच स्वरूपात दर्शवलेली असते. अशा विभागीय विसंगतीमुळे शिक्षक, मुख्याध्यापक आणि स्थानिक प्रशासन यांच्यावर अनावश्यक पाठपुराव्याचा भार पडतो.

२.५ विकासकामांना अडथळे : जमिनीचा हक्क स्पष्ट नसल्यामुळे नवीन वर्गखोल्या, स्वच्छतागृहे, संरक्षक भिंती, क्रीडांगण, पाणीपुरवठा किंवा अन्य सुविधांसाठी प्रशासकीय मंजुरी आणि निधी वापरताना शाळांसमोर अडचणी उभ्या राहत आहेत. नवीन बांधकाम करता येत नाही. दुरुस्ती करता येत नाही. क्रीडांगण विकसित करता येत नाही. इतकेच काय पण ज्ञानराचानावादेखील राबवता येत नाही. यात मूळ प्रश्न असा आहे की, जमिनीची कागदपत्रे वेळेवर पूर्ण न करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची किंवा शिक्षकांची नसताना त्याचे परिणाम विद्यार्थ्यांनी का भोगावेत?

२.६ शाळा स्थलांतरित करण्याचा दबाव : खासगी मालकाचा दावा, वारसांमधील वाद, शासकीय जमिनीच्या वापराविषयी आक्षेप किंवा जमिनीच्या सीमांबाबतचा संघर्ष निर्माण झाल्यास शाळेच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होतो. शाळा स्थलांतरित करणे सोपे नाही. त्यासाठी कुणी धजावत नाही. शिक्षण विभागदेखील जे सुरु आहे ते सुरु ठेवावे उगाच वाद नको यादृष्टीने शिक्षक हिताचा विचार करते. यात गैर काहीही नाही. परंतु अशा प्रकरणात नवीन इमारत मिळेल का याचीही शाश्वती नसते. नवीन जागा उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे शिक्षणाचा खेळखंडोबा होत आहे.

भारतीय संविधानाच्या कलम २१-अ नुसार सहा ते चौदा वर्षे वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा मूलभूत हक्क आहे. या हक्काची अंम लबजावणी करण्यासाठी केवळ शिक्षक नेमणे किंवा पाठ्यपुस्तके देणे पुरेसे नाही. विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात उपलब्ध असलेली, सुरक्षित आणि कार्यक्षम शाळा आवश्यक आहे. जमीन मालकीतील अनिश्चिततेमुळे शाळेचे कामकाज किंवा आवश्यक सुविधा धोक्यात येत असतील, तर प्रशासनाने त्यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. केंद्र सरकारचा Right of Children to Free and Compulsory Education Act, २००९ अर्थात शिक्षण हक्क कायदा हा या विषयासाठी महत्त्वाचा आहे. या कायद्याच्या कलम ६ मध्ये परिसरातील म ुलांसाठी शाळा उपलब्ध करून देण्याची शासनाची जबाबदारी आहे. कलम ८ मध्ये योग्य शासनाची, तर कलम ९ मध्ये स्थानिक प्राधिकरणाची कर्तव्ये नमूद आहेत. जिल्हा परिषद आणि पंचायत यांचा समावेश स्थानिक प्राधिकरणाच्या व्याख्येत होतो. मुळात मुलांना शिक्षण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासन आणि संबंधित स्थानिक प्राधिकरण टाळू शकत नाहीत. मात्र या कायद्यातील शिक्षणाचा हक्क म्हणजे प्रत्येक शाळेची जमीन जिल्हा परिषदेच्या नावावर करण्याची स्वतंत्र, स्वयंचलित मालकीहक्क योजना नाही हे देखील लक्षात घ्यायला हवे.

म्हणूनच शिक्षण हक्क कायद्याच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी जम ीनविषयक प्रश्न सोडविणारे स्वतंत्र प्रशासकीय धोरण आवश्यक आहे. संविधानाच्या कलम ३००-अ नुसार कायद्याच्या अधिकाराशिवाय कोणत्याही व्यक्तीला तिच्या मालमत्तेपासून वंचित करता येत नाही. खासगी मालकाची जमीन शाळेसाठी आवश्यक आहे म्हणून प्रशासन ती विनामोबदला स्वतः च्या ताब्यात घेऊ शकत नाही. मालकीचे वैध हस्तांतरण, मालकाची संमती, लागू कायद्यानुसार संपादन किंवा इतर कायदेशीर मार्ग अवलंबावा लागतो. हि प्रक्रिया वेळखाऊ आहे. मा. सर्वोच्च न्यायालयानेही मालमत्ता संपादनाच्या संदर्भात कायदेशीर प्रक्रिया, सार्वजनिक प्रयोजन आणि भरपाईच्या महत्त्वावर भर दिला आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

यासाठी राज्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांचे जमीनविषयक सर्वे क्षण करणे आवश्यक असून प्रत्येक शाळेच्या नोंदीत पुढील माहिती असणे बंधनकारक करणे गरजेचे आहे.

- गाव, तालुका, जिल्हा आणि शाळेचा अधिकृत संकेतांक.
- जमिनीचे क्षेत्रफळ, सर्वे क्रमांक किंवा गट क्रमांक.
- अभिलेखानुसार जमीनमालक आणि प्रत्यक्ष ताबेदार.
- शाळा सुरू झाल्याचे उपलब्ध पुरावे.
- इमारत व इतर बांधकामांचा तपशील.
- जमीन हस्तांतरण आदेश, दानपत्र किंवा भाडेपट्टा उपलब्ध आहे का.
- न्यायालयीन वाद, हरकती किंवा तृतीय पक्षाचे दावे आहेत का.
- प्रकरण सोडविण्यासाठी आवश्यक असलेली पुढील कायदेशीर कार्यवाही.

जमीन शासनाच्या मालकीची असून शाळेचा वापर वैधरीत्या मंजूर करणे शक्य असेल, तर सक्षम प्राधिकरणाने लागू कायदे व नियमांनुसार हस्तांतरण किंवा वापरहक्काची प्रक्रिया पूर्ण करावी. यासाठी जिल्हाधिकारी, तहसीलदार, जिल्हा परिषद आणि शिक्षण विभाग यांच्यात निश्चित जबाबदाऱ्या ठरवून देणे व त्यांचा नियमित आढावा घेणे गरजेचे आहे. ग्रामपंचायतीच्या मालकीच्या जागेवर शाळा असल्यास संबंधित ग्रामपंचायतीचा ठराव, मालकीचे अभिलेख आणि लागू कायद्यानुसार आवश्यक असलेल्या मंजुरींची तपासणी करून हस्तांतरण कायदेशीरदृष्ट्या शक्य असल्यास जमीन जिल्हा परिषद किंवा शासनाने निश्चित केलेल्या सक्षम सार्वजनिक संस्थेकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी.

खासगी मालकीच्या जमिनींचे प्रश्न एकाच पद्धतीने सोडविता येणार नाहीत. शासनाने पुढील पर्याय उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

संमतीने दान किंवा हस्तांतरण: जमीनमालक व त्यांचे कायदेशीर हक्कधारक तयार असतील, तर योग्य दस्तऐवज तयार करून कायदेशीर हस्तांतरण करावे. लागू मुद्रांक शुल्क, नोंदणी आणि इतर अटींची पडताळणी करावी.

दीर्घकालीन वापरहक्क: जमीनमालक मालकी स्वतःकडे ठेवू इच्छित असेल, तर परस्पर संमतीने, सक्षम मंजुरी घेऊन आणि आवश्यकतेनुसार नोंदणी करून दीर्घकालीन भाडेपट्टा किंवा अन्य वैध वापरहक्काचा विचार करावा. त्यामध्ये शाळेच्या बांधकामाचा हक्क, देखभाल, दुरुस्ती, मुदत, नूतनीकरण आणि वाद निवारणाच्या अटी स्पष्ट असाव्यात.

कायदेशीर संपादन: जमीन सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असून संमतीने तोडगा निघत नसेल, तर लागू संपादन कायद्यानुसार प्रक्रिया सुरू करावी. प्रतिकूल ताब्याचा विचार यात होणे आवश्यक आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने नुकताच याबाबत एक आदेश दिला आहे. त्याचेही अवलोकन प्रशासनाने करणे आवश्यक आहे.

शासनाने स्वतंत्र जिल्हा परिषद शाळा जमीन हक्क नियमितीकरण योजना तयार करणे काळाची गरज आहे. या योजनेत दस्तऐवज शोधण्यासाठी विशेष पथके, कायदेशीर सल्ला, मोजणी, नोंदणी आणि वाद निवारणासाठी निधी असावा. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या समन्वयाने शिक्षणाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, भूमी अभिलेख अधिकारी आणि संबंधित विधी अधिकारी यांची समिती स्थापन करावी. प्रलंबित प्रकरणांचे कारण, जबाबदार कार्यालय आणि पुढील कार्यवाही यांची नोंद ठेवावी.

कायदेशीर नोटीस, अपील आणि न्यायालयीन उपाय यांचा विचार करताना न्यायालयात जाण्याची जबाबदारी नेमकी कोणाची यावर प्रथम चर्चा करणे गरजेचे आहे. अनेकदा सर्वच विभाग याबाबतीत हात वर घेत असल्याचे चित्र आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांच्या बाबतीत जिल्हा परिषदेच्या सक्षम अधिकारी यांनी न्यायालयात दाद मागणे व त्यासाठी विधी सल्ला व वकील यांची नेमणूक करणे गरजेचे आहे. याबाबत शासनाने शासन निर्णय निर्गमित करण्याची फार मोठी गरज आहे.

राज्य शासनाने पुढील मूलभूत तरतुदी असलेला स्वतंत्र शासन निर्णय तयार करण्याची आवश्यकता आहे.

१. राज्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांचे जमीनविषयक सर्वेक्षण बंधनकारक करणे.

२. प्रत्येक शाळेसाठी डिजिटल जमीन नोंदवही तयार करणे.

३. निर्विवाद शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जमिनींच्या हस्तांतरणासाठी निश्चित प्रशासकीय प्रक्रिया आखणे.

४. खासगी जमिनींसाठी संमतीने हस्तांतरण, दीर्घकालीन वापरहक्क आणि कायदेशीर संपादन असे पर्याय स्पष्ट करणे.

५. दस्तऐवज शोधणे, मोजणी, नोंदणी आणि आवश्यक कायदेशीर कार्यवाहीसाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करणे.

६. जिल्हानिहाय प्रगती अहवाल आणि राज्यस्तरीय देखरेख व्यवस्था निर्माण करणे.

७. जमीनविषयक प्रश्नामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित होऊ नये यासाठी प्रत्येक प्रकरणात पर्यायी शैक्षणिक व्यवस्था व आवश्यक अंतरिम उपाय निश्चित करणे.

८. नव्या शाळेच्या बांधकामासाठी प्रशासकीय मंजुरी देताना जमीन हक्काची पडताळणी ही पूर्वअट करणे; परंतु जुन्या शाळांतील विद्यार्थ्यांना तातडीच्या आवश्यक सुविधांपासून वंचित न ठेवता कायदेशीर व सुरक्षित अंतरिम उपायांची तरतूद करणे.

९. सार्वजनिक निधीतून उभारलेल्या इमारतींचे संरक्षण, देखभाल आणि भविष्यातील विस्तारासाठी स्पष्ट जबाबदारी निश्चित करणे.

१०. जमीन मालक, ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समिती आणि संबंधित शासकीय विभाग यांच्यातील वाद सोडविण्यासाठी पारदर्शक तक्रार निवारण व्यवस्था उभारणे.

समारोप – जिल्हा परिषद शाळांच्या जमीन मालकीचा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित राहणे म्हणजे सार्वजनिक शिक्षणाच्या मूलभूत पायाभूत सुविधांबाबतची अनिश्चितता कायम ठेवणे आहे. शाळा उभी करणे ही शासनाची जबाबदारी असेल, तर शाळेला सुरक्षित आणि कायदेशीरदृष्ट्या स्थिर जमीन उपलब्ध करून देणेही त्या व्यवस्थेच्या नियोजनाचा अविभाज्य भाग असला पाहिजे. जुन्या चुका दुरुस्त करण्यासाठी शासनाने विशेष मोहीम राबवावी आणि भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होणार नाही, याची व्यवस्था करावी.

डॉ.प्रविण अशोकराव जोशी
लेखक, कवी, संशोधक
जिल्हा सहसचिव सातारा,
महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती

गड किल्ले बांधण्याची आवड जोपासायला हवी !

गडकोट किल्ले हा महाराष्ट्राचा ऐतिहासिक ठेवा आहे. शून्यातून स्वराज्य निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या सवंगडी मावळ्यांच्या पराक्रमांच्या आणि त्यागाच्या खुणा असलेले हे किल्लेच आपले खरे वैभव आहे.

प्रत्येक गड किल्ल्यांच्या स्वतंत्र इतिहास असून या प्रत्येक गड किल्ल्याने जसा येथील भूमिपुत्रांचा पराक्रम आणि वैभव अनुभवले आहे, तशा परकीयांकडून दिल्या गेलेल्या हाल अपेष्टाही भोगल्या आहेत. छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या बारा गडकिलयांचा



गेल्या वर्षी यूनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांम ध्ये समावेश करण्यात आला ही महाराष्ट्रासह जगभरातील शिवप्रेमींसाठी अभिमानाची बाब आहे. शिवरायांच्या पराक्रमाची आठवण म्हणून गेल्या काही वर्षांत दिवाळीच्या आधी किल्ले बांधण्याची प्रथा राज्यात सुरु झाली.

दिवाळीचा आणि किल्ले बांधण्याच्या प्रथेचा तसा काही संबंध नसला, तरी त्यानिमि त्ताने बालमनावर पराक्रमाचे, स्वाभिमानाचे आणि त्यागाचे संस्कार निर्माण होण्यास मदत होते. उभारलेल्या किल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुर्तीसह अष्टप्रधान मंडळ आणि मावळे यांच्या प्रतिकृती ठेवल्या जातात ज्या शिवरायांच्या आदर्श राज्यकारभाराची जाणीव करून देतात. त्यामुळे या प्रथेचे जतन करणे आवश्यक आहे; आजमितीला किल्ले बनवण्याची प्रथा राज्यातील काही भागांमध्येच जिवंत असलेली पाहायला मिळते.

हल्लीची पिढी ही मैदानी खेळांपेक्षा म ोबाईल, टी.व्ही. आणि व्हिडीओ गेम्सच्या दुनियेत हरवणारी आहे. तिला यातून बाहेर काढायचे असेल, तर तिला अशा काही प्रथांची माहिती करून द्यायला हवी. जेणेकरून मुलांच्या कलागुणांना वाव तर मिळेलच शिवाय त्यांच्याम ध्ये आपल्या इतिहासाविषयी प्रेम निर्माण होऊन पराक्रमाचे आणि नीतिमत्तेचे संस्कार होण्यास मदत होणार आहे.

– सौ. मोक्षदा घाणेकर,
काळाचौकी, मुंबई

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज

थोडक्यात बातम्या

राज्यस्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेसाठी सारा येवलेची निवड



अक्षराज : संदिप येवले

दि.०२, घाटकोपर (मुं.उपनगर) : घाटकोपर येथील सारा संदिप येवले हिची राज्यस्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेसाठी मुंबई विभागाच्या संघात निवड झाली आहे. ही स्पर्धा दिनांक ०२ ते ०४ नोव्हेंबर २०२६ दरम्यान अकोला येथे पार पडणार आहे.

सारा येवले गेली १६ वर्षांपासून वॉरियर तायक्वांदो अकॅडमी, घाटकोपर येथे तायक्वांदो खेळाची प्रॅक्टिस करत आहे. तिच्या या यशाबद्दल तिचे प्रशिक्षक संदिप येवले, आर्यन येवले, पूनम येवले आणि वैष्णवी बाणखेले यांनी अभिनंदन केले आहे. राम निरंजन झुनझुनवाला कॉलेज, घाटकोपर येथे ती १२ वी सायन्स मध्ये शिकत असून म हाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक यतिन राणे यांनीही साराचे अभिनंदन करून तिला पुढील स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या. सारा ही शिस्तप्रिय आणि मेहनती खेळाडू आहे, तिच्या निवडीमुळे महाविद्यालयाला अभिमान वाटत आहे, असे यतिन राणे यांनी सांगितले.

मतदार यादी पुनरीक्षणासाठी दावे-हरकतींची मुदत १३ नोव्हेंबरपर्यंत वाढवली – विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल

अक्षराज : जे.के.पोळ

दि.०२, नवी मुंबई : महाराष्ट्रातील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमांतर्गत दावे व हरकती दाखल करण्याची मुदत भारत निवडणूक आयोगाने १३ नोव्हेंबर २०२६ पर्यंत वाढवली आहे. मतदारांनी या वाढीव मुदतीचा लाभ घेऊन मतदार यादीतील नोंदी तपासाव्यात आणि आवश्यकतेनुसार दावे व हरकती दाखल कराव्यात, असे आवाहन विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांनी केले आहे.

भारत निवडणूक आयोगाने ०१ ऑक्टोबर २०२६ हा अर्हता दिनांक निश्चित करून विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. या कार्यक्रमांतर्गत दावे व हरकती दाखल करण्याची मुदत १३ नोव्हेंबर २०२६ पर्यंत वाढविण्यात आली असून अंतिम मतदार यादी प्रसिद्धी ही ३० नोव्हेंबर, २०२६ रोजी करण्यात येणार आहे. यामुळे मतदारांना आपल्या नोंदींमधील त्रुटी दुरुस्त करण्यासाठी तसेच आवश्यक दावे व हरकती सादर करण्यासाठी अतिरिक्त वेळ उपलब्ध झाला आहे.

सुधारित वेळापत्रक

– दावे व हरकती दाखल करण्याची अंतिम मुदत: १३ नोव्हेंबर २०२६

– दावे व हरकतींच्या नोटीस प्रक्रियेची पूर्तता व निकाली काढण्याची अंतिम मुदत : २५ नोव्हेंबर २०२६

– अंतिम मतदार यादी प्रसिद्धी : ३० नोव्हेंबर २०२६

आपले नाव कुठे शोधावे

नागरिकांनी भारत निवडणूक आयोगाच्या मतदार सेवा पोर्टल electoralsearch.eci.gov.inVgoMvoters.eci.gov.in किंवा ECINET APP वर आपले नाव तपासावे. त्याचप्रम ाणे मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र (ceo.maharashtra.gov.in) तसेच संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध मतदार यादीची पडताळणी करता येईल. याकरिता जिल्ह्यांची संकेतस्थळे याप्रमाणे आहेत. https://thane.nic.in,https://ratnagiri.gov.in, https://palghar.gov.in, https://raigad.gov.in,https://sindhudurg.nic.in, https://mumbaicity.gov.in, https://mumbaisuburban.gov.in. आपल्या मतदान केंद्रावरील मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO), मतदार नोंदणी अधिकारी (ERO) अथवा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (AERO) यांच्या कार्यालयाशी संपर्क साधून ही म तदार यादीबाबत माहिती घेता येईल. मतदारांनी प्रारूप मतदार यादीतील आपली नोंद तपासून आवश्यकतेनुसार विहित मुदतीत दावे व हरकती दाखल कराव्यात, असे आवाहन विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांनी केले आहे.

बाराबाई हिंगणा व वाघोडा गावात बिबट्याची दहशत

दोन वासरांचा पाडला फडशा तर एक गाय गंभीर जखमी; वनविभाग प्रशासन कुंभकर्णी झोपेत



अक्षराज : दिवाकर घेर

दि.०२, नागपूर : नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी, सावनेर, कामठी तालुक्यात मागील अनेक महिन्यापासून बिबट्याचा वावर सुरू असल्यामुळे ग्रामीण भागातील नागरिक व शेतकऱ्यांमध्ये प्रचंड भीतीचे सावट निर्माण झाले आहे. पारशिवनी तालुक्यातील हिंगणा (बाराभाई) व वाघोडा या दोन गावात बिबट्याने धुमाकूळ घालत दोन वासरांची शिकार केली तर एका गाईला गंभीर जखमी केल्याची घटना २ नोव्हेंबर सोमवारला सकाळच्या सुमारास उघडकीस आली असून वन विभाग प्रशासन कुंभकर्णी झोपेत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हिंगणा (बाराभाई) येथे सोमवारला मध्यरात्री रवींद्र जिवतु तांडेकर यांच्या घराशेजारी तुराट्याने बांधलेल्या गोठ्यात बिबट्याने हल्ला चढवून एका वासराला जागीच ठार केले तर बिबट्याच्या हल्ल्यात एक गाय गंभीर जखमी झाली आहे. गावाच्या वेशीवर बिबट्याचा हल्ला झाल्याने ग्रामस्थांमध्ये प्रचंड दहशत निर्माण झाली आहे.

घटनेची माहिती पारशिवनीचे वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल शिंदे यांना देण्यात आली. घटनास्थळ पंचनामा करण्यात असून बिबट्याला जेरबंद करण्यासाठी वनविभाग प्रशासनाकडून हिंगणा (बाराभाई) पिंजरे लावण्यात आले आहेत. दरम्यान बिबट्याला लवकरात लवकर जेरबंद करावे अशी आग्रही मागणी माजी सरपंच कृष्णाज चिखले व माजी उपसरपंच प्रवीण ठाकरे यांनी वनविभागाकडे केली आहे.दुसरीकडे, वाघोडा येथील वार्ड क्रमांक २ मध्ये बिबट्याने पशुधनाला लक्ष्य केले ज्ञानदेव धनराज गेडाम यांच्या शेतात बांधलेल्या गोठ्यात बिबट्याने हल्ला केला, यात एका वासराचा मृत्यू झाला आहे. सदर घटनेमुळे शेतशिवारात काम करणाऱ्या मजुरांमध्ये व शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सदर घटनेची माहिती पोलीस पाटील अविनाश गेडाम यांनी पारशिवनी वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना दिली असून घटनास्थळ पंचनामा करण्यात आला.पारशिवनी तालुक्यातील दोन गावात एकाच दिवशी लागोपाठ झालेल्या बिबट्याच्या हल्ल्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांची सुरक्षा ऐरणीवर आली आहे. रात्रीच्या वेळी पशुधनाची देखभाल करणे व पहाटे शेतीकामासाठी जाणे शेतकऱ्यांसाठी जीवघेणे ठरत आहे. वनविभागाने परिसरात ट्रॅप कॅमेरे लावून बिबट्याच्या हालचालींवर २४ तास पाळत ठेवावी आणि गस्त वाढवावी व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक भरपाई द्यावी अशी मागणी सावनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रवींद्र चिखले यांच्यासह दोन्ही गावातील ग्रामस्थांकडून केली जात आहे.

पैशापेक्षा पाण्याचे महत्त्व अनन्यसाधारणच !



प्रस्तावना : पैशाची श्रीमंती की पाण्याची समृद्धी?

आजच्या आधुनिक युगात माणूस पैशाच्या मागे धावत आहे. मोठे घर, आलिशान गाड्या, आधुनिक सुखसोयी, व्यवसायातील प्रगती आणि बँकेतील वाढत्या ठेवी यांनाच समृद्धीचे प्रतीक मानले जात आहे. पैसा मिळविण्यासाठी माणूस दिवस-रात्र मेहनत करतो, भविष्यासाठी बचत करतो आणि आपल्या कुटुंबाचे आर्थिक भविष्य सुरक्षित करण्याचा प्रयत्न करतो. परंतु या सर्व धावपळीत आपण जीवनाच्या सर्वांत मूलभूत गरजेचा विचार करतो का? ती गरज म्हणजे पाणी!

एक क्षण कल्पना करा, आपल्या बँक खात्यात लाखो रुपये आहेत; घरात सर्व आधुनिक सुविधा आहेत; परंतु पिण्यासाठी एक ग्लास स्वच्छ पाणी उपलब्ध नाही. अशा वेळी त्या पैशाचे आणि सुखसोयींचे मूल्य किती उरेल? पैशाने पाण्याची बाटली काही वेळा विकत घेता येईल; परंतु संपूर्ण समाजाला दीर्घकाळ पुरेल इतके पाणी केवळ पैशाच्या जोरावर निर्माण करता येईलच असे नाही.

म्हणूनच आजच्या काळात एक महत्त्वाचा विचार प्रत्येकाच्या मनात रुजला पाहिजे

पैसा जीवन सुसह्य करतो; पण पाणी जीवन शक्य करते!

यंदाची पाणीटंचाई : महाराष्ट्रासमोरील गंभीर आव्हान

२०२६ चा पावसाळा संपल्यानंतर महाराष्ट्रासमोर उभे राहिलेले पाणीटंचाईचे आव्हान चिंतन करायला लावणारे आहे. यंदा राज्यात पावसाचे वितरण असमान राहिले. काही भागांत समाधानकारक पाऊस झाला, तर अनेक भागांना पावसाच्या खंडाचा आणि अपुऱ्या पर्जन्यमानाचा सामना करावा लागला. जून ते सप्टेंबर या कालावधीत राज्यात सरासरीपेक्षा सुमारे १८.८ टक्के कमी पाऊस नोंदविण्यात आल्याचे वृत्त आहे. सुरुवातीला राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यांत दुष्काळ घोषित करण्यात आला; त्यानंतर ही संख्या ३०५ तालुक्यांपर्यंत वाढल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले. या पार्श्वभूमीवर शेतकरी, ग्रामीण भागातील नागरिक आणि स्थानिक प्रशासनासमोर पाणी व्यवस्थापनाचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

राज्य शासनाने १६ ऑक्टोबर २०२६ पासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात किमान १० टक्के पाणीकपात करण्याचे निर्देश दिल्याचेही वृत्त आहे. या निर्णयातून उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची गरज अधोरेखित होते.

याचा अर्थ असा की, पाणीटंचाई ही केवळ उन्हाळ्यात निर्माण होणारी तात्पुरती समस्या राहिलेली नाही. पावसाचे अनिश्चित स्वरूप, जलसाठ्यांचे नियोजन, भूजलाचा वाढता उपसा आणि पाण्याच्या वापरातील निष्काळजीपणा यांमुळे परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होत आहे.

यंदाची परिस्थिती आपल्याला स्पष्ट इशारा देत आहे पाऊस आपल्या हातात नसला, तरी पडलेल्या पावसाचा प्रत्येक थेंब जपणे आपल्या हातात आहे!

आपण पैशाला संपत्ती मानतो; परंतु पाणी ही संपत्ती निर्माण करणारी मूलभूत शक्ती आहे. अन्नासाठी शेती आवश्यक, शेतीसाठी पाणी आवश्यक आणि जीवनासाठी अन्न व पाणी आवश्यक आहे. त्यामुळे पाण्याचे मूल्य केवळ पैशांत मोजता येत नाही.

निसर्गाने आपल्याला दिलेले पाणी अमर्याद आहे, असा समज करून घेणे ही मोठी चूक आहे. पृथ्वीवर पाणी मोठ्या प्रमाणात असले, तरी त्यातील सर्व पाणी पिण्यासाठी किंवा शेतीसाठी थेट वापरता येत नाही. उपलब्ध गोड्या पाण्याचे योग्य व्यवस्थापन, प्रदूषणापासून संरक्षण आणि पुनर्भरण करणे अत्यावश्यक आहे.

चिंतन आणि मनन : तहान लागल्यावरच पाण्याची किंमत का कळते?

पावसाळ्यात धरणे भरलेली असतात, नद्या वाहत असतात आणि विहिरींना पाणी असते, तेव्हा पाण्याचे महत्त्व अनेकदा दुर्लक्षित केले जाते. नळ उघडला की पाणी मिळते, ही सवय इतकी अंगवळणी पडली आहे की त्यामागील निसर्गचक्राचा आपण विचारच करत नाही.

परंतु उन्हाळा सुरू झाला, विहिरींची पाणीपातळी खाली गेली, बोअरवेल आटल्या आणि टँकरसाठी रांगा लागल्या की पाण्याचे खरे महत्त्व जाणवू लागते. पाणी मिळविण्यासाठी महिलांना दूरवर जावे लागते, शेतकऱ्यांना पिके वाचविण्यासाठी धडपड करावी लागते आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची चिंता निर्माण होते.

एका बाजूला काही ठिकाणी पिण्यायोग्य पाणी वाहनांच्या स्वच्छतेसाठी किंवा अनावश्यक काम ांसाठी वापरले जाते; तर दुसऱ्या बाजूला अनेक कुटुंबांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागतो. ही परिस्थिती केवळ पाण्याच्या कमतरतेची नाही, तर आपल्या सामूहिक जबाबदारीचीही आहे.

प्रश्न असा आहे की, पाणी संपल्यानंतर जागे होण्यात काय अर्थ? संकट आल्यानंतर उपाय शोधण्यापेक्षा संकट येऊ नये म्हणून आजपासून प्रयत्न करणे अधिक शहाणपणाचे नाही का?

पाण्याची कमतरता ही निसर्गाची समस्या असू शकते; पण पाण्याचा अपव्यय ही मानवी निष्काळजीपणाची समस्या आहे.

निसर्ग आपल्याला पाणी देतो; पण त्या पाण्याचे संवर्धन करणे ही आपली जबाबदारी आहे. आपण ही जबाबदारी पार पाडली नाही, तर पुढील पिढ्यांना त्याची मोठी किंमत मोजावी लागू शकते.

उपाययोजना : पाणी वाचविणे हा पर्याय नाही, तर काळाची गरज!

पाणीटंचाईवर मात करण्यासाठी केवळ शासनाच्या योजना किंवा पावसाची प्रतीक्षा पुरेशी नाही. शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायती, शेतकरी, उद्योग, सहकारी संस्था आणि सामान्य नागरिक या सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

१. पावसाच्या पाण्याचे संधारण

पावसाचे पाणी वाहून जाऊ देण्याऐवजी ते जमिनीत मुरविणे ही काळाची गरज आहे.

२. गावागावांत जलसंधारणाची चळवळ

गावातील जुने तलाव, विहिरी, ओढे, नाले आणि पारंपरिक जलस्रोत यांचे पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे.

३. घराघरांत पाणी बचतीची सवय

दात घासताना नळ बंद ठेवणे, गळणारे नळ त्वरित दुरुस्त करणे, वाहन धुण्यासाठी पाइपऐवजी बादली वापरणे आणि पिण्यायोग्य पाणी अनावश्यक कामांसाठी न वापरणे अशा छोट्या सवयी मोठा फरक घडवू शकतात.

४. भूजल उपशावर नियंत्रण

बोअरवेल खोदणे आणि भूजल उपसणे हा पाणीटंचाईवरील कायमस्वरूपी उपाय नाही. भूजलाचे पुनर्भरण होण्यापेक्षा उपसा अधिक झाला, तर पाणीपातळी खाली जाते.

५. पाणीपुरवठ्यातील गळती आणि अपव्यय रोखणे

शहरांमध्ये आणि गावांमध्ये पाणीपुरवठ्याच्या पाइपलाइनमधून होणारी गळती थांबविणे ही अत्यंत महत्त्वाची उपाययोजना आहे.

उपाययोजनांची उपयुक्तता : आजची बचत, उद्याची सुरक्षितता

पाणी बचतीच्या उपाययोजना केल्याने केवळ उन्हाळ्यातील टंचाई कमी होत नाही, तर त्याचे अनेक दूरगामी फायदे होतात.

भूजल पुनर्भरणामुळे योग्य ठिकाणी विहिरी आणि बोअरवेलमधील पाण्याची उपलब्धता सुधा

पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी पैसा खर्च करणे महत्त्वाचे आहे; परंतु त्याहून महत्त्वाचे म्हणजे खर्च केलेल्या पैशातून पाण्याची शाश्वत उपलब्धता निर्माण होते आहे का, हे तपासणे!

प्रत्येक गावाने स्वीकारावा 'जलसंकल्प' : आपले गाव पाणीसमृद्ध व्हावे, शेतकऱ्याला पाण्यासाठी संघर्ष करावा लागू नये, महिलांना पाण्यासाठी दूरवर जावे लागू नये आणि पुढील पिढीला पाण्याची भीषण टंचाई अनुभवावी लागू नये, यासाठी प्रत्येक गावाने सामूहिक जलसंकल्प स्वीकारण्याची गरज आहे.

पाणी वाचविणे ही केवळ एखाद्या व्यक्तीची किंवा संस्थेची जबाबदारी नाही. ही संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

भावी पिढ्यांसाठी पाण्याचा वारसा जपूया!

आपण आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी बचत करतो, त्यांच्या भविष्यासाठी आर्थिक नियोजन करतो, त्यांना चांगले घर आणि उत्तम जीवनमान मिळावे म्हणून प्रयत्न करतो. परंतु त्यांच्या भविष्यात स्वच्छ पाणी उपलब्ध असेल का, याचा विचारही तितक्याच गांभीर्याने केला पाहिजे.

आजच्या पिढीने पाण्याचा अमर्याद वापर केला, जलस्रोत प्रदूषित केले आणि भूजलाचा बेसुमार उपसा केला, तर उद्याच्या पिढीसमोर आपण कोणता वारसा ठेवणार आहोत?

निष्कर्ष : पैशाची श्रीमंती नव्हे, पाण्याची समृद्धी महत्त्वाची!

यंदाची पाणीटंचाई ही केवळ निसर्गाने दिलेली परीक्षा नाही; ती आपल्या नियोजनाची, जबाबदारीची आणि विकासाच्या दृष्टिकोनाचीही परीक्षा आहे.

आपण आर्थिक प्रगती केली, मोठमोठे रस्ते बांधले, उंच इमारती उभारल्या, उद्योग वाढविले आणि आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात केले. परंतु या प्रगतीसोबत जलसंपत्तीचे संवर्धन झाले नाही, तर विकासाचा पाया कमकुवत राहील.

विकास म्हणजे केवळ रस्ते, इमारती, कारखाने आणि आर्थिक उलाढाल नव्हे. विकास म्हणजे प्रत्येक घरापर्यंत स्वच्छ पाणी पोहोचणे, प्रत्येक शेताला गरजेपुरते पाणी मिळणे, प्रत्येक गावाचा जलसाठा सुरक्षित राहणे आणि निसर्गाचा समतोल टिकून राहणे.

पैसा माणसाला प्रतिष्ठा देऊ शकतो; परंतु पाणी त्याला जीवन देते. पैशाने अनेक सुविधा विकत घेता येतात; परंतु पाण्याशिवाय त्या सुविधांचा उपयोग उरत नाही. त्यामुळे पाण्याचे महत्त्व केवळ टंचाईच्या काळात आठवून चालणार नाही, तर समृद्धीच्या काळातही त्याचे जतन केले पाहिजे.

आज आपण बँकेतील ठेवी वाढविण्याबरोबर भूजलसाठा वाढविण्याचा विचार केला पाहिजे. आर्थिक गुंतवणुकीबरोबर जलसंधारणात गुंतवणूक केली पाहिजे. पैशाची बचत करण्याबरोबर पाण्याचा अपव्यय रोखला पाहिजे.

कारण आर्थिक संपत्ती संकटातून बाहेर पडण्यासाठी मदत करू शकते; पण पाण्याची उपलब्धता सुरक्षित ठेवण्यासाठी दूरदृष्टी, नियोजन आणि निसर्गाशी सुसंवाद आवश्यक आहे.

पैसा संपला तर पुन्हा कमावता येतो; पण पाण्याचे स्रोत संपले, तर ते पूर्ववत करण्यासाठी वर्षानुवर्षे प्रयत्न करावे लागू शकतात!

म्हणूनच आता वेळ आली आहे पैशाच्या बचतीबरोबर पाण्याची बचत करण्याची, विकासाच्या स्पर्धेत निसर्गाला सोबत घेण्याची आणि प्रत्येक थेंबाला जीवनाचे मूल्य देण्याची!

चला, पाण्याला केवळ नैसर्गिक साधन न मानता जीवनाचा अमूल्य ठेवा समजूया. प्रत्येक घरात पाणी बचतीची सवय रुजवूया. प्रत्येक गावात जलसंधारणाची चळवळ उभी करूया. प्रत्येक थेंबाचा योग्य वापर करून जलसमृद्ध महाराष्ट्र घडविण्यास हातभार लावूया.

पैसा कमावूया, संपत्ती निर्माण करूया; पण त्याचबरोबर पाण्याचा अमूल्य ठेवा जपूया!

पाण्याचा प्रत्येक थेंब जपूया

जलसमृद्ध गाव घडवूया

भावी पिढ्यांचे भविष्य सुरक्षित करूया!

कारण अखेरीस, माणसाची खरी श्रीमंती त्याच्या तिजोरीतील पैशानेच नव्हे, तर त्याच्या समाजात उपलब्ध असलेल्या स्वच्छ पाण्यानेही मोजली गेली पाहिजे.

पत्रकार विकास दळवी
दैनिक अक्षराज, ठाणे प्रतिनिधी

चंद्रपुरात भव्य बाईक रॅली व जनसंकल्प मेळावा संपन्न

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.०२, चंद्रपूर : विदर्भ राज्य आंदोलन समिती, चंद्रपूरच्या वतीने आज दिनांक ०२ नोव्हेंबर २०२६ रोजी जिजाऊ गार्डन, चंद्रपूर येथेविदर्भ निर्माण जनसंकल्प मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाला विदर्भ राज्य आंदोलन समितीचे अध्यक्ष तथा माजी आमदार ॲड. वामनराव चटप होते. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष देशोन्नतीचे संपादक प्रकाश पोहरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

विदर्भ राज्याच्या निर्मितीचा संकल्प अधिक बळकट करण्यासाठी विदर्भप्रेमींच्या सहभागातून चंद्रपूर शहरात म हाकाली मंदिरापासून जिजाऊ गार्डनपर्यंत भव्य बाईक रॅली काढण्यात आली. त्यानंतर आयोजित सभेमध्ये विविध पदाधिकाऱ्यांनी विदर्भाचे ऐतिहासिक, भौगोलिक, आर्थिक व राजकीय महत्त्व विशद करून स्वतंत्र विदर्भ राज्याच्या निर्मितीची गरज अधोरेखित केली. विदर्भाचा सर्वांगीण विकास, शेतकरी,शेतमजूर, बेरोजगार युवकांचे प्रश्न आणि स्वतंत्र विदर्भाचा हक्क यासाठी एकजुटीने संघर्ष करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. 'जय विदर्भ, विदर्भ राज्य झालेच पाहिजे,' अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी मेळाव्याला उपस्थितांमध्ये अरुण केदार, उपाध्यक्ष, विदर्भ राज्य आंदोलन समिती,प्रा.मंजुषाताई तिरपुडे,मुकेश मासुरकर. माजी



मंत्रीडॉ. रमेशकुमार गजभिये, प्रा.डॉ.पी.आर.राजपूत,सुनील चोखारे, शालिकराव माऊलीकर, जिल्हाध्यक्ष वि.रा.आ.स .चंद्रपुर,तात्यासाहेब मत्ते,ॲड. दीपक चटप,कपिल इद्दे, मितीन भागवत, ॲड. तब्बसुम शेख, मुन्नाभाऊ आवळे, मुन्नाभाऊ खोब्रागडे, अंकुश वाघमारे, दिलीप देरकर, उपनगराध्यक्ष राजुरा, रमेश नळे नगरसेवक राजुरा, सिद्धार्थ पथाडे, व इतर सर्व मान्यवर, पदाधिकारी मेळाव्यास उपस्थित होते.

अक्षराज

सेवा संकल्प अभियान' ठरले यशस्वी, हजारो नागरिकांच्या समस्या एकाच छताखाली मार्गी

शासकीय योजना थेट सामान्यांच्या दारी; मंत्री प्रताप सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली महायुती शासनाच्या उपक्रमाला नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद

अक्षराज : घनश्याम आंबोकर

दि.०२, मिरा भाईंदर : मिरा भाईंदर शहरात शासन आणि सामान्य नागरिक यांच्यामधील दुरावा संपवून, पारदर्शक प्रशासन राबवत शासकीय सेवा थेट लोकांच्या दारापर्यंत पोहोचवण्याच्या उद्दिष्टाने हाती घेण्यात आलेल्या 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत आयोजित भव्य तालुकास्तरीय शिबिराने सामान्य जनतेच्या जीवनात एक मोठा सकारात्मक बदल घडवून आणला आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्हा पालकमंत्री प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली, जिल्हाधिकारी ठाणे, उपविभागीय अधिकारी ठाणे व अपर तहसीलदार कार्यालय मिरा-भायंदर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिराने लोककल्याणकारी प्रशासनाचा एक नवा आणि प्रभावी आदर्श निर्माण केला आहे.



अनेकदा सर्वसामान्यांना साधी कागदपत्रे मिळवण्यासाठी, शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी किंवा आपल्या अडीअडचणींचे निराकरण करण्यासाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात. कागदपत्रांची पूर्तता, किचकट कार्यालयीन प्रक्रिया आणि वेळेचा अपव्यय यामुळे अनेक नागरिक हक्काच्या लाभापासून वंचित राहतात. ही दरी सखोलपणे समजून घेत मंत्री प्रताप सरनाईक यांच्या विशेष पुढाकाराने या शिबिरात महसूल विभाग, भूमि अभिलेख, शिधावाटप, मीरा भाईंदर महानगरपालिका (आरोग्य व समाज विकास विभाग), आर.टी.ओ. आणि सहकार विभाग यांसारख्या विविध महत्त्वाच्या यंत्रणा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

या महाशिबिरामध्ये शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग बांधव आणि समाजातील वंचित घटकांसाठी विविध योजनांचे लाभ प्रत्यक्षरीत्या सुलभ करण्यात आले. महसूल विभागांतर्गत विविध दाखले (उत्पन्न, रहिवासी, ज्येष्ठ नागरिक, नॉन-क्रीमीलेअर इ.) असे मिळून एकूण ११० दाखले वाटप करण्यात आले, तर महिलांच्या नावे ७/१२ चे ०८ दाखले, मोहीम अंतर्गत ७/१२ चे १४ आणि वन हक्क दाव्यांचे ७ ई चे ३९ उतारे/दाखले वितरित करून महसूल विभागाने एकूण १७१ नागरिकांना थेट दिलासा दिला. भूमि अभिलेख विभागामार्फत गावठाण सनद, मिलकत पत्रिका व क प्रत वाटपाची एकूण ४९ प्रकरणे मार्गी लावण्यात आली. तसेच शिधावाटप विभागामार्फत नवीन शिधापत्रिका आणि नावे वाढवणे/कमी करण्याचे एकूण ६० अर्ज निकाली काढण्यात आले.

नागरिकांच्या आरोग्य आणि सामाजिक विकासाला सर्वोच्च प्राधान्य देत मीरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत जन्म-विवाह प्रमाणपत्रे, आयुष्मान कार्ड वाटप आणि आरोग्य तपासणी शिबिराद्वारे ४९ नागरिक लाभान्वित झाले. समाज विकास विभागामार्फत पीएमएसकेई ओळखपत्र, एस.एच.जी. प्रमाणपत्र व इतर महिला-कल्याणकारी लाभांची २० प्रकरणे पूर्ण करण्यात आली.

याशिवाय, मालमत्ता हस्तांतरण, कराची आकारणी आणि विशेष महत्त्वाच्या अशा शासकीय जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकूल करण्याच्या अर्जांना अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला; यामध्ये १४० मालमत्ता प्रकरणे आणि तब्बल १४० अतिक्रमण अर्ज स्वीकृतीसह एकूण ४८९ प्रकरणे हाताळण्यात आली, जी या अभियानाची सर्वात मोठी उपलब्धी ठरली आहे.

याप्रसंगी बोलताना मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले की, जनसेवा हीच ईश्वरसेवा आहे. शासन आणि प्रशासन हे केवळ जनतेच्या सेवेसाठी कटिबद्ध आहे. केवळ कागदोपत्री अर्ज स्वीकारणे हा या अभियानाचा उद्देश नसून, प्रत्यक्षात किती नागरिकांच्या समस्या सुटल्या आणि किती कुटुंबांच्या चेहऱ्यावर समाधान आले, यावर या अभियानाचे खरे यश अवलंबून आहे. महिला शेतकऱ्यांना आर्थिक व सामाजिकदृष्ट्या सक्षम करणे आणि कोणतीही पात्र व्यक्ती शासकीय लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेणे, हे प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मूळ कर्तव्य आहे. 'सेवा संकल्प अभियान'च्या या यशस्वी आयोजनामुळे मिरा-भाईंदर परिसरातील नागरिकांमध्ये प्रचंड व आनंद व समाधानाचे वातावरण पाहायला मिळत असून, शासकीय यंत्रणेवरील सर्वसामान्यांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. भविष्यातही अशाच जनहिताच्या उपक्रमांची मालिका सुरू ठेवण्यात येईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

महिला पत्रकाराला पोलिसांकडून मारहाण

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाकडून निषेध; संबंधितांवर सक्त कारवाई करण्याची मागणी, अन्यथा आंदोलनाचा इशारा

अक्षराज : जे.के.पोळ

दि.२७, नवी मुंबई : नवी मुंबई येथील महिला पत्रकार प्रिया खंडागळे यांना पोलीस कर्मचाऱ्याकडून मारहाण झाल्याच्या गंभीर घटनेने पत्रकारिता क्षेत्रात तीव्र संताप व्यक्त होत आहे. लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावरच हल्ला होत असेल तर सर्वसामान्यांच्या सुरक्षेचे काय, असा सवाल उपस्थित होत आहे. या घटनेचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला आहे.

स्थानीय माहितीनुसार नवी मुंबई परिसरात सुरू असलेल्या कुंठणखाना व्यवसायाबाबत ग्रामस्थांच्या तक्रारीवरून पत्रकार प्रिया खंडागळे यांनी वृत्त प्रसिद्ध केले होते. संबंधित वृत्तामुळे परिसराची बदनामी होऊ नये आणि अवैध व्यवसाय बंद व्हावेत अशी नागरिकांची मागणी होती. मात्र या वृत्ताचा राग धरून संबंधित महिला पोलीस अधिकाऱ्याने पत्रकार तरुणीला मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या घटनेनंतर डॉ. विश्वासराव आरोटे यांनी आक्रमक भूमिका घेत सरकारला थेट इशारा दिला आहे. संबंधित महिला पोलीस कर्मचाऱ्याची तातडीने गडचिरोली येथे बदली करावी, तिच्यावर निष्पक्ष चौकशी करून कठोर विभागीय कारवाई करावी आणि पत्रकार प्रिया खंडागळे यांची जाहीर माफी मागावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

डॉ. आरोटे म्हणाले की, पत्रकार हा कोणत्याही राजकीय पक्षासाठी काम करत नाही, तर जनतेचे प्रश्न, भ्रष्टाचार आणि समाजातील अनिष्ट प्रवृत्ती यांना वाचा फोडणे हे त्याचे कर्तव्य आहे. पत्रकार असल्याचे माहीत असूनही मारहाण करणे आणि नंतर माफी मागून प्रकरण दाबण्याचा प्रयत्न करणे हे लोकशाहीत कदापि खपवून घेतले जाणार नाही.

याप्रकरणी ठाणे पोलीस आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तसेच पोलीस महासंचालकांकडे लेखी तक्रार देण्यात आली आहे. राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन दोषींवर तातडीने कारवाई करावी. अन्यथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. सणासुदीच्या काळातही पत्रकारांना रस्त्यावर उतरावे लागले तर त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल.



कुंठणखान्यासारख्या अवैध व्यवसायांना कोणाचे राजकीय पाठबळ आहे का, याचीही सखोल चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. समाजहिताचा विषय निर्भयपणे मांडणाऱ्या धाडसी महिला पत्रकार प्रिया खंडागळे यांचे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाकडून अभिनंदन करण्यात आले.

केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदकाने अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे आणि पोलीस निरीक्षक प्रभावती एकुरके सन्मानित

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.०२, चंद्रपूर : राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेल्या अवैध किडनी विक्री प्रकरणाचा तसेच अवैध सावकारी प्रकरणाचा यशस्वी तपास करुन उल्लेखनीय कामगिरी करणारे चंद्रपूरचे अप्पर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांना भारत सरकारच्या गृह मंत्रालयाकडून सन २०२६ चे प्रतिष्ठित केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक जाहीर झाले आहे. यासोबतच सध्या रामनगर पोलीस ठाण्यात ठाणेदार म्हणून कार्यरत असलेल्या महिला पेलीस निरीक्षक प्रभावती एकुरके यांनाही विशेष तपासातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल हे पदक प्रदान करण्यात आले आहे. या दोन्ही अधिकाऱ्यांच्या यशामुळे चंद्रपूर पोलीस दलाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या पोलीस-१ विभागाने यासंदर्भात आदेश जारी केला असून, केंद्रीय गृहमंत्री यांच्या मान्यतेने विशेष मोहीम, तपास आणि न्यायवैद्यक शास्त्र या क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना २०२६ चे केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक जाहीर करण्यात आले आहे. अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चेत आलेल्या अवैध किडनी विक्री प्रकरणाचा तसेच अवैध सावकारी प्रकरणाचा सखोल तपास करून महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली होती. या प्रकरणांमधील गुन्हेगारीचे स्वरूप, त्यामागील यंत्रणा आणि संबंधित आरोपींचा शोध घेण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली. त्यांच्या या उल्लेखनीय तपासकार्याची केंद्र सरकारने दखल घेत त्यांना या प्रतिष्ठित पदकाने सन्मानित केले आहे.

तर रामनगर पोलीस ठाण्याच्या ठाणेदार महिला पोलीस निरीक्षक प्रभावती एकुरके यांनी नागपूर येथे कार्यरत असताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आलेल्या गंभीर प्रकरणाचा तपास केला होता. या प्रकरणाचा तपास करताना त्यांनी कर्नाटक राज्यातील कारागृहातून संबंधित आरोपीला अटक केली होती. या प्रकरणात दहशतवादविरोधी कायद्यांतर्गत कारवाई करण्यात आली होती. अत्यंत संवेदनशील आणि आव्हानात्मक प्रकरणाचा यशस्वी तपास केल्याबद्दल त्यांच्या कार्याची केंद्र सरकारने दखल घेतली आहे.



महाराष्ट्रातील पोलीस दलातील अन्य अधिकाऱ्यांचाही या पुरस्कारासाठी समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये कुमार चिंता, पोलीस अधीक्षक ऋषिकेश रेड्डी, एसीपी राम ेश्वर रेंगे, पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा गायकवाड, पोलीस निरीक्षक माणिक बेंद्रे, रितेश अहेर, रामचंद्र मोहिते आणि महिला पोलीस निरीक्षक अश्विनी अभिजीत पाटील यांचा समावेश आहे.

गुन्हेगारी विरोधातील प्रभावी तपास, धाडसी निर्णयक्षमता आणि कर्तव्याप्रती असलेली निष्ठा यांची दखल राष्ट्रीय स्तरावर घेतली जाणे ही अभिमानाची बाब आहे. अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे आणि महिला पोलीस निरीक्षक प्रभावती एकुरके यांच्या या सन्मानामुळे चंद्रपूर पोलीस दलाचा गौरव वाढला असून, पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

थोडक्यात बातम्या

पनवेल महानगरपालिकेत 'लोकशाही दिन' निमित्त नागरिकांच्या तक्रारींचे निवारण

अक्षराज : जे.के.पोळ

दि.०२, पनवेल : सर्व सामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयातील बैठक कक्षामध्ये सोमवार, दिनांक ०२ नोव्हेंबर रोजी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'लोकशाही दिनाचे' आयोजन करण्यात आले. यावेळी अतिरीक्त परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त मंगला माळवे, उपायुक्त स्वरूप खारगे, शहर अभियंता राजेश कर्डिले, उप अभियंता विलास चव्हाण, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख किर्ती महाजन, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी विविध विभागातील एकुण तीन अर्ज दाखल झाले होते. या अर्जाची दखल घेऊन नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यात आल्या.



महानगरपालिकेत दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. या दिवशी सार्वजनिक सुट्टी असल्यास त्यानंतर येणारा कामकाजाचा दिवस लोकशाही दिन म्हणून पाळण्यात येतो. नागरिकांनी आपले वैयक्तिक अर्ज समन्वय अधिकाऱ्यांकडे १५ दिवस आधी द्यावेत. संबंधित नागरिकांनी लोकशाही दिनादिवशी उपस्थित रहावे, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

वर्षा मांढरे यांना राज्यस्तरीय 'कर्तृत्ववान मराठा नवदुर्गा सन्मान २०२६' प्रदान

अक्षराज : स्वप्निल जावळे

दि.०२, शिरवळ (सातारा) : अखंड मराठा फाउंडेशन ट्रस्ट, महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या 'कर्तृत्ववान मराठा नवदुर्गा २०२६' या राज्यस्तरीय सोहळ्यात, रयत शिक्षण संस्थेच्या रयत इंग्लिश मीडियम स्कूल, शिरवळच्या मुख्याध्यापिका वर्षा सागर मांढरे यांना अत्यंत प्रतिष्ठेचा 'नवदुर्गा सन्मान २०२६' प्रदान करण्यात आला.



हा भव्य सन्मान सोहळा भारतरत्न पंडित भीमसेन जोशी कलामंदिर, औंध, पुणे येथे संपन्न झाला. या कार्यक्रमास मुंबईच्या महापौर रितूताई तावडे तसेच मंघनाताई साकोरे बोर्डीकर राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांची प्रमुख उपस्थिती लाभली, तर शिवसंग्राम संघटनेच्या नेत्या ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या शुभहस्ते हा गौरव करण्यात आला. समाजाप्रती असलेले निस्वार्थ योगदान, शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी, उत्कृष्ट व्यवस्थापन व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेले अथक परिश्रम याची दखल घेऊन फाउंडेशनने त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली होती. मांढरे मॅडम यांच्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य आप्पासाहेब देशमुख यांनी विषेश कौतुक व अभिनंदन केले. तसेच संस्थेचे पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, शिक्षक-पालक समिती चे सदस्य, शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

सोयगाव - शेंदुर्णी मार्गावर ठिकठिकाणी खड्डे; वाहनधारकांची गैरसोय

रस्त्याची डांबरी पृष्ठभाग उखडल्याने अपघाताचा धोका; दुरुस्तीची मागणी



अक्षराज : पूनम परदेशी

दि.०२, सोयगाव (छ.संभाजीनगर) : सोयगाव ते शेंदुर्णी या मार्गाची ठिकठिकाणी दुरवस्था झाली असून, रस्त्यावरील डांबरी पृष्ठभाग उखडल्याने मोठमोठे खड्डे पडले आहेत. यामुळे या मार्गावरून ये-जा करणाऱ्या वाहनधारकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.या मार्गावरून दररोज मोठ्या संख्येने दुचाकी व चारचाकी वाहनांची वाहतूक होते. मात्र, रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडल्यामुळे वाहनचालकांना सावधगिरीने प्रवास करावा लागत आहे. विशेषतः दुचाकीस्वारांना खड्ड्यांमधून मार्ग काढताना वाहनाचा तोल जाण्याची तसेच अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.काही ठिकाणी डांबर उखडून रस्त्यावरील खडी उघडी पडली आहे. त्यामुळे वाहनांचा वेग मंदावला असून, प्रवासासाठी अधिक वेळ लागत आहे.

या मार्गावरून नियमित प्रवास करणाऱ्या नागरिकांकडून रस्त्याच्या दुरवस्थेबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे.सोयगाव-शेंदुर्णी हा मार्ग स्थानिक नागरिकांसह इतर प्रवाशांसाठी महत्त्वाचा असल्याने संबंधित विभागाने रस्त्याची पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी खड्डे बुजवावेत व रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी वाहनधारक व नागरिकांकडून होत आहे.

नांदेड जिल्ह्यासाठी ३ नोव्हेंबरला 'येलो अलर्ट'; विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता

अक्षराज : प्रतिनिधी

दि.०२, नांदेड : प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी दि.०३ नोव्हेंबर २०२६ रोजी एक दिवसासाठी 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. या दिवशी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहण्याची तसेच विजांच्या कडकडाटासह आणि ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व संबंधित यंत्रणांनी आवश्यक खबरदारीच्या उपाययोजना कराव्यात. नागरिकांनीही हवामानाची स्थिती लक्षात घेऊन सतर्क राहावे आणि वीज, वादळी वारे व पावसाच्या कालावधीत सुरक्षिततेच्या उपाययोजनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने केले आहे.